नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०९/०३/२०२६ (सोमवार )

## नागपुर ग्रामीण जिल्हयात नव्याने सुरू होणारे पोलीस स्टेशन मोहपा, पाचगाव आणि वडोदा येथे भेट देवुन मा.पोलीस अधिक्षक यांनी केली पाहणी

गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या कडील अधिसूचनेन्वये नवीन पोलीस स्टेशन, मोहपा, पाचगाव आणि वडोदा हे लवकरच कार्यान्वित होणार असून त्याअनुषंगाने आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी नव्याने सुरू होणारे तिन्ही पोलीस स्टेशन च्या इमारतींची पाहणी केली. यावेळी मा. पोलीस अधिक्षकांनी पोलीस स्टेशन इमारतीची स्थिती, उपलब्ध सुविधा तसेच पोलीस स्टेशन सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यवस्था यांची माहिती घेतली.तसेच लवकारात लवकर पुर्तता करण्याबाबत संबधीतांना सुचना देण्यात आल्या.

सदर वेळी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा , संबधीत उपविभागचे उपविभागिय पोलीस अधिकारी, तसेच इतर पोलीस आधिकारी आणि कार्यालयीन स्टाफ हजर होते.

पोलीस स्टेशन मोहपा






पोलीस स्टेशन पाचगाव




पोलीस स्टेशन वडोदा



# अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

पो.स्टे. काटोल :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. ७८४/२०२४ कलम ७४, ७५, ७६, ३५१(३), ३५२ भादंवि सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १२/०९/२०२४ रोजी फिर्यादी हे त्यांची अल्पवयीन पिडीत मुलगी वय १२ वर्ष ०६ महिने हिचेसह राशनचे धान्य आणण्याकरीता त्याचे मोपेड गाडीने आले व राशनचे धान्य घेवुन परत जात असता .हातला बस स्टॉप जवळ यातील आरोपी नामे **वैभव संजय पोजदार, वय २६ वर्ष, रा. हातला ता. काटोल जि. नागपूर** याने फिर्यादीला मौजा डोरली गावापर्यंत सोडुन दे असे म्हणुन आरोपी हा फिर्यादीचे गाडीवर त्याचे मागे बसला त्याचे मागे फिर्यादीची मुलगी असे मिळुन ट्रिपलसिट गावाकडे जात असता मौजा चारगाव जवळ यातील आरोपी याने फिर्यादीचे मुलीचे दोन्ही हात पकडुन एका हाताने तिला अश्लिल स्पर्श करून तिचा विनयभंग केला. फिर्यादीने हटकले असता फिर्यादीला आणि त्याच्या मुलीला जिवाने मारण्याची धमकी दिली.

पोलीस उपनिरीक्षक श्री गजानन कंगाले, नेमणुक पोस्टे काटोल यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **आज दिंनाक ०९/०३/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ०३ श्री एस.एच. ग्वालानी यांनी वरील नमुद आरोपी वैभव संजय पोजदार, वय २६ वर्ष, रा. हातला ता. काटोल जि. नागपूर यास १) कलम ७४ भान्यासं मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास २) कलम ७५(i) (ii) भान्यासं मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास ३) कलम ७६ भान्यासं मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास ४) ३५१(२) भान्यासं मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास ५) ३५२ भान्यासं मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५**

**दिवस साधा कारावास ६) कलम ०८ पोक्सो मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व २०००/—रू दंड. दंड न भरल्यास ०२ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. कल्पना पी. पांडे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, पोनि श्री रंजीत सिरसाठ, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल, सपोनि श्री विशांत नांदगाये, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार बाबा नेवारे, ब. नं. ८२ पोस्टे काटोल यांनी मदत केली आहे.

## क्रिकेट सट्टा/बेटिंग लावुन जुगार खेळणाऱ्यांवर धाड गुन्हा नोंद पोलीस स्टेशन बुट्टीबोरी यांची कामगिरी

पोलीस स्टेशन बोरी :— दिनांक ०८/०३/२०२६ रोजी बोरी पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, भारत विरूध्द न्युझीलॅड टी —२० विश्वचषक अंतीम सामना असल्याने बोरी हद्‌दीत मौजा आसोला शिवार, धवळपेठ पुलाखाली १ इसम सदर सामन्यावर मोबाईल द्वारे लोकांकडुन पैसे घेवुन हार जीतचा जुगार खेळत व खेळवीत आहे. अशा विश्वसनिय माहीतीवरून पोलीस घटनास्थळी पोहचले असता मौजा आसोला शिवार, धवळपेठ पुलाखाली १ संशयीत इसम मिळुन आला. त्यांना विचारपुस केली असता **आरोपी १) हर्षल रतनजी देवळे, वय २७ वर्ष, रा. वार्ड नं. ३, आसोला ता. हिंगणा हा मिळुन आला त्याच्या मोबाईल ची पाहणी केली असता गुगल क्रोम मध्ये NICE 24 या** आयडी वरून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रिकेट सट्टयावर ग्राहकांकडुन ऑनलाईन पैसे घेतल्याचे दिसुन आले. नमुद आरोपीला अधिक विचारपुस केली असता त्याने सदर आयडी आारोपी **२) आदिश विनोद डफ, रा. बोरी याचे कडुन विकत घेतल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीया ताब्यातुन १) ॲंड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/— रुपये.२) रोख रक्कम ८००/— रुपये असा एकूण १०,८००/— रुपयांचा** मुददेमाल जप्त केला.

आरोपी नामे १) आरोपी १) हर्षल रतनजी देवळे, वय २७ वर्ष, रा. वार्ड नं. ३, आसोला ता. हिंगणा २) आदिश विनोद डफ, रा. बोरी यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन बोरी येथे कलम ४९ भान्यासं सह कलम १२(अ) म. जू. का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. देवलापार पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक ०८/०३/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मोरफाटा दर्गा शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे १) अक्षय कवडु धारने, वय २५ वर्ष, रा. वार्ड कं ५, कांद्री माईन मनसर २) कुणाल ज्ञानेश्वर मेश्राम, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र. ९ नगरधन, ता.रामटेक, जि. नागपुर ३) राजेंद्र रामचंद्र पराये, वय ५५ वर्ष, रा. कुमारटोली, जुनाबगडंगज नागपुर ४) प्रशांत दिनेश आकरे, वय २५ वर्ष, रा. गरबा चौक, बगडगंज नागपुर ५) दिपक सुरेश सराटे, वय २६ वर्ष, रा.ईतवारी दही बाजार, झाडेचौक नागपुर हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन नगदी १६००/—रूपये असा एकुण १६००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन देवलापार येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नगपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक ०८/०३/२०२६ रोजी देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी क्र. १) नामे रविंद्र नथ्थुलाल तिवारी, वय ६५ वर्ष, रा. वार्ड कं ५,

**कटंगी जि. बालाघाट २) नेमीचंद लुनकरण कोचर, वय ५६ वर्ष, रा. वार्ड क्र. १४, कटंगी जि. बालाघाट (मध्यप्रदेश)** हे मौजा मोरफाटा, दर्गा परिसर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीतांवर कलम २७ एन.डी. पी.एस. कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०३ गुन्हे नोंद

दिनांक ०८/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ७,६४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन खापा अंतर्गत **आरोपी अमोल चिंतामन पुडके, वय ३६ वर्ष, रा. कोच्छी** याचेवर १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड **अंतर्गत आरोपी भोजराज गोपाळराव शिवर्क, वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्र. १०, नरखेड** याचेवर **१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे **महिला आरोपी** हिचेवर १ गुन्हा नोंद आहे. **अशा एकुण ०३ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने